नि.फौ.प्र.क्र.१६/२०२४
सरकार -वि.- जगन नारखेडे+१३
**निशाणी क्र.२६४**

## सरकारतर्फे साक्षीदार क्रमांक ५ याची जबानी

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,
नांव - हनुमान प्रल्हादराव जगताप,
वय - ५१ वर्षे, व्यवसाय – खाजगी व्यवसाय (पत्रकार),
रा. - शिवाजीनगर, मलकापुर, ता. मलकापुर जि.बुलडाणा

**सरतपास- सरकारी अभियोक्ता श्री.के.व्ही.गारमोडे यांचेमार्फत शपथेवर सुरु....**

पोलीसांनी मला जप्ती पंचनाम्याकरिता मलकापुर शहर पोलीस स्टेशन येथे दि.१३.१२.२०२३ रोजी बोलावले. माझ्यासोबत दुसरे पंच राहूल गणेश देशमुख हे होते. पोलीसांनी तो पंचनामा मशिन जप्त केल्याबाबतचा असून तसेच त्यातील मशिनमधील भागांचा जप्त केल्याबाबतचा होता. पोलीसांनी त्यास सुट्टया भागात डी.व्ही.डी. आणि सी.डी. जप्त केल्या होत्या व अजून एक माल जप्त केला होता. परंतु तो मला आठवत नाही. तो पंचनामा संध्याकाळी ६.३० वाजता करण्यात आला असून तो पंचनामा एक तास चालला. आम्ही पंचांव्यतिरिक्त तेथे पोलीस अधिकारी व फॉरेन्सीक अधिकारी हजर होते. आता मला जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी साक्षीदार क्र. १ म्हणून सही आहे त्यातील मजकूर खरा व बरोबर आह. त्यास **निशाणी क्र.२६५** देण्यात आला.

०२. तसेच मला पोलीसांनी कार जप्तीचा पंचनामा करण्याबाबत दि. ३०.११.२०२३ रोजी पोलीस स्टेशनला बोलावले होते. त्या गाडीचा क्र.एम.एच-१९-८००० असा काही तरी होता. आता मला निशाणी क्र.२६१ कडील जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी साक्षीदार क्र.१ म्हणून सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे.

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलटतपास- आरोपी क्र.१ तर्फे विधीज्ञ श्री.एन.सी.जाधव यांचेमार्फत सुरु....</u>**

०३. जप्त करण्यात आलेल्या मशिन कशाच्या होत्या, कोणाच्या होत्या व कोणत्या कंपनीच्या होत्या, हे काही मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी मला फोन केला व फोन करुन बोलावून घेतले. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी आधीच दोन्ही पंचनाम्यातील मजकूर लिहून ठेवला होता व मी तेथे गेल्यानंतर पोलीसांनी माझ्या सह्या घेतल्या.

**उलटतपास पूर्ण.**

**<u>उलटतपास- आरोपी क्र.२ व ३ तर्फे विधीज्ञ श्री.तांदुळकर यांचेमार्फत सुरु....</u>**

०४. नाकारला.

**<u>उलटतपास- आरोपी क्र.५ तर्फे विधीज्ञ श्रीमती एन.के.डोसे यांचेमार्फत सुरु....</u>**

०५. नाकारला.

**<u>उलटतपास- आरोपी क्र.६,७, ९ व १४ तर्फे विधीज्ञ श्री.जी.डी.पाटील यांचे मार्फत सुरु....</u>**

०६. नाकारला.

**<u>उलटतपास- आरोपी क्र.८ तर्फे विधीज्ञ श्री.एन.एस.तायडे यांचेमार्फत सुरु....</u>**

०७. नाकारला.

**<u>उलटतपास- आरोपी क्र.१० तर्फे विधीज्ञ श्री.एस.डी.मराठे यांचेमार्फत सुरु....</u>**

०८. नाकारला.

**<u>उलटतपास- आरोपी क्र.१३ तर्फे विधीज्ञ श्री.बी.एस.वानखेडे यांचेमार्फत सुरु....</u>**

०९. नाकारला.

**<u>उलटतपास- आरोपी क्र.११ तर्फे विधीज्ञ श्री.आर.एस. जगताप यांचेमार्फत सुरु....</u>**

१०.        नाकारला.

**<u>उलटतपास- आरोपी क्र.१२ तर्फे विधीज्ञ श्रीमती आर.डी.संचेती यांचेमार्फत सुरु....</u>**

११.        नाकारला.

**<u>उलटतपास- आरोपी क्र.०४ तर्फे विधीज्ञ श्री.एस.एस.शेख यांचेमार्फत सुरु....</u>**

१२.        नाकारला.

श्रवणोत्तर स्वीकृत,

Digitally signed by PARAG SATISH THAKARE
Date: 2025.07.09 17:51:42 +0530

दिनांक : ०९/०७/२०२५.

**( पी.एस.ठाकरे )**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(न्यायालय क्र.१), मलकापूर